
बंध...
जुनेच गीत गातसे, भावहि असे जुना
स्वर स्वर आतुरला, गत स्मृती छेडण्या ॥ १ ॥
रोजचीच रात्र अन, अंबरी रोजचाच चंद्रमा
खेळ तरीही खेळती, नित्य नव्याने चांदण्या ॥ २ ॥
रुते शल्य जुने, सांज शामली कातरताना
कधी दु:ख मनी, कधी आनंद पाहुणा ॥ ३ ॥
मी उंच अवकाशी, माझे स्वप्न पाहण्या
न कळे व्याप्ती तयांची, अर्थ अवघड उमजण्या ॥ ४ ॥
शोधता स्वप्ने मनीची, काही निसटती चांदण्या
ये पुन्हा भूवरी मी, त्यास अलगद वेचण्या ॥ ५ ॥
साथ घेतो मी नभाची, स्वप्न माझे वाहण्या
चांदण्या जाती प्रभाती, त्या निशेच्या पाहुण्या ॥ ६ ॥
वाट पाहतो रात्रीची, स्वप्न माझे सांगण्या
तारकाही नित्य येती, स्वप्न माझे रंगण्या ॥ ७ ॥
उगम जाणण्या खुशाल, विहरलो दिशा दिशांना
बंध गवसती युगायुगांचे, शब्द नसे सांगण्या ॥ ८ ॥
- © सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78